Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक क्रं. 2

विषय: शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमाच्या **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** महाविद्यालय स्तरावरील परीक्षेच्या नियोजनाबाबत.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील सर्व पारंपारिक अभ्यासक्रमासाठी (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विहित प्रकियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमाच्या (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

1. पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमाच्या **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** विद्यार्थ्यांच्या परीक्षा **दि. 05 जून, 2022 ते 24 जून, 2022** या कालावधीमध्ये महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर **प्रचलित ऑफलाईन स्वरूपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून** घेण्यात याव्यात.
2. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. 27 एप्रिल, 2022 च्या पत्रान्वये व त्यानुसार विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मार्च/एप्रिल 2022 च्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्रश्नसंचिका (Question Bank) उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच पदवी प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक करतांना दोन पेपरमध्ये किमान 02 दिवसांचे अंतर ठेवण्यात यावे. तसेच लेखी परीक्षेसाठी प्रत्येक तासाला 15 मिनिटे याप्रमाणे वेळ वाढवून देण्यात यावी.
3. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्नसंचिका (Question Bank) तयार करण्यात यावी. प्रश्नसंचिका (Question Bank) किमान 5 ते 10 पट असावी. सदरची प्रश्नसंचिका (Question Bank) फक्त मार्च/एप्रिल 2022 करीता लागू राहील. तसेच सदर प्रश्नसंचिका (Question Bank) सर्व परीक्षार्थींना उपलब्ध करून देण्यात यावी.
4. पेपर सेट तयार करतांना जी प्रश्नसंचिका (Question Bank) प्रसिध्द / उपलब्ध केली आहे त्या मधीलच प्रश्न असावेत याची दक्षता संबंधीत पेपर सेटर यांनी घ्यावी. प्रश्नसंचिका (Question Bank) व पेपर सेट करण्यासाठी संबंधीत शिक्षकांना मानधन हे सद्या पेपर सेटींगसाठी असलेल्या नियमानुसार राहिल.
5. सदर परीक्षा महाविद्यालय/मान्यताप्रापत शिक्षण संस्था स्तरावर प्रचलित ऑफलाईन पध्दतीने होणार असल्याने ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात. सदर शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबतचे पत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी द्यावे.
6. उपरोक्त पदवी पारंपारिक **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्याबाबतची कार्यवाही संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांनी करणेची आहे.

7. उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक तयार करतांना विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या पदवी (भाग 2 व 3 ) परीक्षेचे वेळापत्रक अवलोकनी घेवून प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात यावे.

8. दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन ज्या त्या महाविद्यालयातील प्राचार्य / समन्वयक, दूरशिक्षण केंद्र यांनी करणेचे आहे. तसेच महाविद्यालयाच्या परीक्षा समितीमध्ये समन्वयक, स्टडी सेंटर यांचा समावेश करण्यात यावा व दूरशिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षाबाबत काही शंका असल्यास मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मागर्दशन घ्यावे.

9. दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचा एखादा विषय महाविद्यालयात शिकविला जात नसल्यास नजिकच्या महाविद्यालयातील शिक्षकांच्याकडून त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका गोपनीय पध्दतीने तयार करून घेवून परीक्षा घेण्यात याव्यात. तसेच प्रश्नपत्रिका तपासून प्राप्त गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत भरण्यात यावेत.

10. परीक्षेशी संबंधीत प्रात्यक्षिक / प्रबंध / प्रकल्प / मौखिक परीक्षा प्रचलित ऑफलाईन पध्दतीने संबंधीत अभ्यासमंडळाच्या सूचनेनुसार आयोजित करण्यात याव्यात. तसेच सदर परीक्षेच्या अनुषंगाने काही अडचणी उदभवल्यास संबंधीत विषयाचे बीओएस चेअरमन, मा. अधिष्ठाता यांचे मार्गदर्शन घेण्यात यावेत. तसेच विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या पदवी (भाग 2 व 3 ) परीक्षेचे वेळापत्रक अवलोकनी घेवून प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात यावे.

11. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रचलित ऑफलाईन पध्दतीने परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्याने त्याबाबतची अनुषंगिक तयारी करण्यात यावी. तसेच सदरबाबतची सूचना सर्व संबंधीतांना देणेत याव्यात.

12. सदर परीक्षेत जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत / गुणाबाबत कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

13. सदर परीक्षेकामी होणारा खर्च महाविद्यालयाकडील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या 75% परीक्षा शुल्कामधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा.

14. महाविद्यालय / अधिविभाग स्तरावर परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

15. सदर परीक्षेचे कार्यवलन / संचलन / पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक यांचे मार्फत करणेची आहे.

16. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. शिवाजी वि. / परीक्षक नियुक्ती / आरव्हीसी / 152
दि. 17 MAY 2022
प्रत:

1. मा. प्राचार्य / संचालक, सर्व पारंपारिक महाविद्यालये यांना माहितीसाठी / योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
2. सर्व उपकुलसचिव / सहा.कुलसचिव / समन्वयक– परीक्षा विभाग
3. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
5. इंटरनेट विभाग – सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी
6. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
7. पात्रता विभाग, पी.जी. प्रवेश विभाग – माहितीस्तव
8. जनसंपर्क अधिकारी कार्यालय – प्रसिध्दीकरीता